तरुण भारत रत्नागिरी

पान नं. ५

दिनांक २५-०४-2023

# फिनोलेक्सतर्फे २०३ क्षयरुग्णांसाठी पोषण रेशन किटस्

प्रतिनिधी
रत्नागिरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमानुसार जिल्हा क्षय अधिकारी रत्नागिरी यांच्याकडून आवाहन करण्यात आले. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशने या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि रत्नागिरी जिल्ह्यातील २०३ रुग्णांना पौष्टिक रेशन किट दानासाठी दत्तक घेतले. मंगळवारी रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र रत्नागिरी येथून वितरण मोहिमेला सुरुवात झाली.



रत्नागिरी : फिनोलेक्सतर्फे क्षयरुग्णांना रेशन किटस वाटप करताना डॉ. फुले, सोबत डॉ. आठल्ये, डॉ. गावडे आणि फिनोलेक्स अधिकारी वर्ग.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन हे आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, जलसंधारण आणि स्वच्छता यासारख्या विविध क्षेत्रात काम करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील क्षयरुग्णांसाठी २०३ पोषण रेशन किट्स दान करून 'निक्षय मित्र' बनून आरोग्यामध्ये आणखी एक मोलाचा दगड गाठला आहे.

वितरण प्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संघमित्रा फुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये,अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. गावडे, जिल्हा क्षय अधिकारी डॉ. सुर्यवंशी, टेक्निकल फिनोलेक्स इंडस्ट्रीज संचालक चक्रवर्ती आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.

जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या निर्देशानुसार किटमध्ये मूग डाळ, चना, खजूर , तांदूळ, प्रथिने पावडरचे पॅकिट, खाद्यतेल असे स्वरूप आहे. पुढील ६ महिन्यांसाठी हे किट देण्यात येणार आहे.

EDIT-8/ IND

रत्नागिरी टाइम्स    पान .नं. ९
बुधवार ५/०४/2023






फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे रत्नागिरी जिल्ह्यातील क्षयरुग्णांसाठी २०३ पोषण रेशन किट्स दान करण्यात आली आहेत.

# मुकुल माधव व फिनोलेक्स इंडस्ट्रीजची आरोग्य क्षेत्रात अजून एक भरीव कामगिरी

रत्नागिरी, ४ एप्रिल : फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशन हे आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, जलसंधारण आणि स्वच्छता यासारख्या विविध क्षेत्रात काम करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील क्षयरुग्णांसाठी २०३ पोषण रेशन किट्स दान करण्यात आली आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमानुसार जिल्हा क्षय अधिकारी रत्नागिरी यांचेकडून आवाहन प्राप्त झाले. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशने आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आणि रत्नागिरी जिल्ह्यातील २०३ रुग्णांना पौष्टिक रेशन किट दानासाठी दत्तक घेतले.

आज दिनांक ४ एप्रिल रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र रत्नागिरी येथून वितरण मोहिमेला सुरुवात झाली.

डॉ. संघमित्रा फुले, सिव्हिल सर्जन रत्नागिरी, डॉ. अनिरुद्ध आठल्ये आरोग्य अधीकारी रत्नागिरी, डॉ. गावडे, अतिरिक्त आरोग्य अधीकारी, जिल्हा क्षय अधिकारी रत्नागिरी, डॉ. सुरवंशी , श्री चक्रवर्ती संचालक टेक्निकल फिनोलेक्स इंडस्ट्रीज रत्नागिरी आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनची टीम उपस्थित होती.

जिल्हा क्षयरोग अधिकारी यांच्या निर्देशानुसार किटमध्ये मूग डाळ, चना, खजूर , तांदूळ, प्रथिने पावडरचे पॅकेट, खाद्यतेल असे स्वरूप आहे. पुढील ६ महिन्यांसाठी हे किट देण्यात येणार आहे.

या उदार देणगीबद्दल डॉ. संघमित्रा फुले, डॉ. अनिरुद्ध आठल्ये आणि डॉ. गावडे यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशनच्या सौ. रितू प्रकाश छाब्रिया यांचे विशेष आभार मानले.

पुढारी

पान नं. ३

बुधवार ५/०४/2023



रत्नागिरी : पोषण आहाराचे वाटप करताना फिनोलेक्स कंपनीचे संचालक चक्रवर्ती, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठले, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ. महेंद्र गावडे.

# फिनोलेक्सने घेतले २०३ क्षय रुग्णांना दत्तक!

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत केंद्रीय क्षयरोग विभागामार्फत प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत रत्नागिरी तालुक्यातील फिनोलेक्स कंपनी, मुकुल माधव फाऊंडेशमार्फत जिल्ह्यातील २०३ क्षय रुग्णांना दत्तक घेऊन ६ महिन्यांकरिता पोषण आहार पुरविला जाणार आहे. या पोषण आहाराची मंगळवार पासून सुरुवात झाली असून, रत्नागिरी तालुक्यातील ४० क्षय रुग्णांना हा आहार देण्यात आला.

क्षयरुग्णांना दर महा ५०० रुपये रुग्णाच्या खात्यावर जमा केले जातात. परंतु ही मदत अत्यंत अल्प असून, या खेरीज अन्नपुरवठा व इतर सुविधा व सहकार्य देणे आवश्यक आहे जेणेकरून रुग्णाची प्रकृती तत्परतेने पूर्ववत होण्यास मदत होईल. त्या अनुसंगाने केंद्रीय स्तरावरून निक्षय मित्र होऊन रुग्णांना सहकार्य करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याद्वारे दानशूर व्यक्ती, औद्योगिक संस्था, सामाजिक संस्था यांना आवाहन केले आहे. त्या आवाहनानुसार फिनोलेक्स कंपनीने त्यांना मदत करण्याचा निर्णय घेतला.

याची सुरवात रत्नागिरीतील ४० रुग्णांपासून करण्यात आली. यावेळी फिनोलेक्स कंपनीचे संचालक चक्रवर्ती, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संघमित्रा फुले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठले, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ. महेंद्र गावडे, वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र डॉ. सूर्यवंशी, सागर चिवटे व्यवस्थापक फिनोलेक्स कंपनी, संदीप गोगले एच आर व्यवस्थापक फिनोलेक्स कंपनी, डॉ. अनुप करमरकर फिनोलेक्स कंपनी, अभिषेक साळवी तसेच क्षयरोग विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.